महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ३० ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १२४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये




## भारत होणार जागतिक मेरीटाईम हब

**२१ व्या शतकात भारताचे सागरी क्षेत्र वेगाने पुढे जात आहे. २०२५ हे वर्ष भारताच्या सागरी क्षेत्रासाठी महत्त्वाचे आहे. काही खास उपलब्धीबाबत मी सांगू इच्छितो. २०२५ साली जगातील सर्वात लांब जहाज भारताच्या किनारी आले. पहिल्यांदा भारतीय बंदरांनी सर्वाधिक व्यवसायाची नोंद गेली. जेएनपीटीमध्ये भारत मुंबई कंटेनर फेज २ ची सुरुवात झाली आहे. येथील वाहतूक क्षमता दुप्पटीने वाढली आहे. त्यामुळे हे बंदर आता देशातील सर्वात मोठे बंदर झाले आहे. त्यासाठी मी सिंगापूरच्या भागिदारांचे आभार मानतो.**

**- पंतप्रधान नरेंद्र मोदी**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज मुंबई दौरा होता. ते आज मुंबईत आले होते. या महत्त्वाच्या भेटीदरम्यान ते अनेक सागरी कार्यक्रमांना उपस्थित राहिले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी मेरीटाईम लीडर्स कॉन्क्लेव्हला संबोधित केले. जे भारताच्या सागरी क्षेत्राच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. याव्यतिरिक्त पंतप्रधान ग्लोबल मेरीटाईम सीईओ फोरमचे अध्यक्षपद भूषवले आहे. हा मंच मुंबईतील नेस्को प्रदर्शन केंद्रात आयोजित इंडिया मेरीटाईम वीक २०२५ चा अविभाज्य भाग आहे.

इंडिया मेरीटाईम वीक २०२५ हे समुद्र अमृत काल व्हिजन २०४७ साकार करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. या व्हिजनचे प्राथमिक ध्येय २०४७ पर्यंत भारताला जागतिक सागरी व्यापाराचे एक प्रमुख केंद्र बनवणे आहे. यावेळी बोलताना नरेंद्र मोदींनी मोठे वक्तव्य केले आहे. यात सागरी क्षेत्रात ऐतिहासिक बदल झाल्याचे त्यांनी सांगितले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, २०१६ मध्ये मुंबईत या परिषदेचे आयोजन झाले होते. आज ही परिषद ग्लोबल इव्हेंट झाला आहे, ही आनंदाची बाब आहे. जगातील ८५ देशांहून अधिक जणांची भागिदारी आहे. सीईओ, स्टार्ट अप, पॉलिसी मेकर आणि गुंतवणूकदार हे सर्व जण याठिकाणी उपस्थित आहेत. सगळ्यांच्या दृष्टीने या परिषदेची एनर्जी वाढली आहे. शिपिंग क्षेत्राशी निगडीत करार याठिकाणी होत आहेत. भारतातील सागरी क्षेत्रावर जगाचा किती विश्वास आहे, हे त्यातून स्पष्ट होते, असे त्यांनी सांगितले.

सागरी क्षेत्रातील कार्गो वाहतुकीत मोठी वाढ झाली आहे. आपल्या बंदरांचा नेट अन्युअल सरप्लस वाढला आहे. आज भारतीय बंदर हे सर्वात कार्यक्षम बंदर म्हणून ओळखले जातात. विकसित देशांहून अधिक कार्यक्षमता आपली बंदर सिद्ध करत आहेत. कित्येक देशांहून ही कामगिरी चांगली आहे. भारतीय बंदर हे जागतिक सागरी वाहतुकीसाठी आकर्षण ठरत आहेत. शिपिंग सेक्टर मध्ये ह्युमन रिसोर्समध्ये भारताचा डंका वाजत आहे. गेल्या एका दशकात सीफेररची संख्या सव्वा लाखावरून ३ लाखांपर्यंत पोहोचले आहेत. कुठल्याही समुद्री किनार्यावरएक तरी भारतीय सीफेरर दिसतील, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे.



## ठाणे मनपाच्या नविन प्रशासकीय भवनाच्या कामाचा आयुक्तांनी घेतला आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (29) :** ठाणे शहराचे नागरिकरण झपाट्याने होत असून वाढती लोकसंख्या लक्षात घेवून नागरिकांना पुरेशा सेवासुविधा देता याव्यात यासाठी महापालिकेचे नवीन प्रशासकीय भवन उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. सदरची प्रशासकीय इमारत वर्तकनगर येथील रेमंड कंपनीच्या परिसरात उभारण्यात येणार असून या इमारतीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी आज आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये प्राथमिक कामे वेगाने करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या बैठकीस अतिरिक्त आयुकत (1) संदीप माळवी, अतिरिक्त आयुकत 2 प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, उपनगर अभियंता विकास ढोले, विनोद पवार, शुभांगी केसवाणी, कार्यकारी अभियंता धनंजय मोदे, आसावरी सोरटे यांच्यासह संबंधित कंत्राटदार उपस्थित होते.

ठाणे महानगरपालिकेचे अस्तित्वातील प्रशासकीय भवन हे चार मजली असून वाढत्या कामाची व्याप्ती लक्षात घेता जागा अपुरी पडत आहे. आगामी काळातील जागेची उपलब्धतता लक्षात घेवून रेमंड कंपनीच्या जागेत 32 मजली इमारत उभारण्यात येणार असून या इमारतीच्या कामास प्रत्यक्ष सुरूवात झाली आहे. या संदर्भात आयुक्तांनी सर्व संबंधित विभागाचा आढावा घेतला. या जागेतील बहुतांशी झाडे बाधित होत असून ती नष्ट न करता त्यांचे नवीन जागेत पुनर्रोपण करण्याचे काम सुरू असल्याची माहिती या बैठकीत संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी दिली. महापालिकेच्या सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतीत असलेल्या कार्यालयांची जागा व आगामी काळात आवश्यक असलेली जागा विचारात घेवून त्यानुसार नियोजन करण्यात यावे. तसेच या विभागांमध्ये अधिकारी कर्मचारी यांची बैठक व्यवस्था योग्य प्रकारे होण्यासाठी जागेचे नियोजन करण्यात यावे. तसेच मा. महासभेचे सभागृह स्वतंत्ररित्या बांधण्यात येणार असून आगामी 50 वर्षातील नगरसेवकांची संख्या लक्षात घेवून बैठक व्यवस्था करावी अशाही सूचना यावेळी दिल्या. तसेच इमारतीमधील सर्व मजल्यांवरील कार्यालयांमध्ये पुरेसा सूर्यप्रकाश व खेळती हवा राहिल याकडे काटेकोरपणे लक्ष द्यावे अशी चर्चा यावेळी करण्यात आली.

सद्यस्थितीमध्ये शहर विकास विभागामार्फत नकाशे व आराखड्यास मंजुरी प्राप्त झाली असून मृदुपरीक्षणाचे काम सुरू आहे तर केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय यांच्याकडून आवश्यक त्या मान्यता प्राप्त झाल्या आहेत. अंदाजे सन 2027 मध्ये पूर्ण होणाऱ्या या इमारतीचे बांधकाम विहित मुदतीत या दृष्टीने नियोजन करुन काम करावे असे निर्देशही यावेळी आयुक्तांनी दिले.

## लक्षवेधी

### दिवाळीच्या हंगामात लालपरीची 'चांदी'!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** यावर्षी दिवाळी हंगामात राज्य परिवहन (एसटी) ला तब्बल ३०१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाने मिळवले आहे. त्याखालोखाल धुळे व नाशिक या विभागाचा क्रमांक आहे. चांगले उत्पन्न आणल्याबद्दल परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी या विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. यावर्षी १८ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर या दिवाळीच्या १० दिवसात एसटी महामंडळाला दररोज सरासरी ३० कोटी याप्रमाणे तब्बल ३०१ कोटी रुपये उत्पन्न मिळाले. विशेष म्हणजे दिवाळी सुट्टीच्या परतीच्या दिवशी २७ ऑक्टोबरला ३९ कोटी ७५ लाख रुपये उत्पन्न मिळवून या वर्षातील सर्वाधिक उत्पन्नाचा नवा विक्रम केला आहे. एसटीच्या ३१ विभागात सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाने आणले असून ते २० कोटी ४७ लाख रुपये आहे. त्याखालोखाल धुळे विभागाने १५ कोटी ६० लाख रुपये आणि नाशिक विभागाने १५ कोटी ४१ लाख रुपयांचा महसूल गोळा केला आहे. मागील वर्षीच्या दिवाळी हंगामापेक्षा यावर्षी महामंडळाने तब्बल ३७ कोटी रुपये उत्पन्न जास्त मिळाले आहे.

### आनंद दिघे नाट्यगृहात डॉ. कुमुद कानिटकरांच्या छायाचित्रसंग्रहाचे प्रदर्शन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ महानगरपालिकेच्या धर्मवीर आनंद दिघे नाट्यगृहातील प्रदर्शन दालनात आता नागरिकांना अकराव्या शतकातील शिलाहारकालीन शिवमंदिराचे अप्रतिम शिल्पवैभव जवळून अनुभवता येणार आहे. ज्येष्ठ प्राच्यविद्या संशोधिका डॉ. कुमुद कानिटकर यांच्या दीर्घ अभ्यासातून तयार झालेल्या संग्रहातील दुर्मिळ छायाचित्रे आणि माहितीचे हे प्रदर्शन अंबरनाथकरांसाठी एक पर्वणी ठरणार आहे. हे कायमस्वरूपी प्रदर्शन नाट्यगृहात प्रेक्षक, अभ्यासकांना पाहता येणार आहे. अंबरनाथच्या 'आम्रनाथ या नावाने प्रसिद्ध असलेल्या या मंदिराचा उल्लेख शके ९८७ (इ.स. १०६०) मधील शिलालेखात आढळतो. शिलाहार वंशातील माम्वणी या महामंडलेश्वराने हे मंदिर बांधल्याचे त्यावरून स्पष्ट होते. डॉ. कानिटकर गेली २५ वर्षांहून अधिक काळ अंबरनाथच्या ऐतिहासिक शिवमंदिराचा सखोल अभ्यास करीत आहेत. त्यांच्या वैयक्तिक संग्रहातील हे अनमोल दस्तऐवज आणि छायाचित्रे त्यांनी अंबरनाथ नगरपालिकेकडे कायमस्वरूपी सुपूर्द केली आहेत. कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार आणि मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्या पुढाकाराने नाट्यगृहाच्या प्रदर्शन दालनात ही मांडणी करण्यात आली असून शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, इतिहास संशोधक आणि प्राचीन कला रसिकांसाठी हे प्रदर्शन ज्ञानवर्धक ठरणार आहे.




### ठाकरे गटाच्या वतीने तहसीलदार, कृषी अधिकाऱ्यांना निवेदन

**शेतकऱ्यांना पन्नास हजार हेक्टरी नुकसान भरपाई देण्याची मागणी**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला असून कल्याण तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांचे भातशेतीचे नुकसान झाले असून शासनाने पन्नास हजार हेक्टरी मदत द्यावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आली असून कल्याण तहसीलदार तसेच तालुका कृषी कार्यौलयात भेट घेऊन निवेदन दिले,नायब तहसीलदार पंजाबराव पवार तसेच तालुका कृषी अधिकारी सुयैकांत कांबळे यांनी निवेदन स्वीकारले, शिवसेना ठाकरे गटाचे कल्याण तालुका प्रमुख नरेश सुरोशी, मुरबाड विधानसभा प्रमुख विश्वनाथ जाधव, संपर्क प्रमुख रमेश बांगर, युवासेना सचिव नितीन सुरोशी, अनंता जाधव, संघटक फहीम जुवारी, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोमनाथ मिरकुटे आदि उपस्थित होते, अवकाळी पावसाने पुन्हा एकदा भातशेतीला मोठा फटाका बसला आहे, समाधानकारक पावसामुळे यंदा चांगले उत्पादन मिळेल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती,मात्र अधुनमधून सातत्याने पाऊस पडत असल्याने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या भातशेतीचे नुकसान झाले आहे, याबाबत शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख नरेश सुरोशी यांनी सांगितले की आवटोबर महिन्यात जोरदार पाऊस पडला भातशेती उद्ध्वस्त केली आहे, शेतातील पिके आडवी झाली आहेत, शासनाने पुन्हा एकदा पंचनामे करून जगाचा पोशिंदा म्हणजे शेतकरी याला उभा करण्यासाठी पन्नास हजार हेक्टरी नुकसान भरपाई द्यावी यासाठी कल्याण तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन दिले आहे असे सांगितले.

## कल्याण स्थानक सॅटिस प्रकल्पाला गती

### आयुक्तांची उच्चस्तरीय बैठक; अडथळे दूर करून कामाला वेग देण्याचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. २९ :** कल्याण स्थानक सेंटिस प्रकल्पास गती मिळण्यासाठी आयुक्त अभिनव गोयल यांच्या दालनात अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीस परिमंडळ ३चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे, वाहतूक विभाग, शहर अभियंता अनिता परदेशी, परिवहन व्यवस्थापक विजयकुमार द्वासे, उपायुक्त समीर भूमकर, संदीप तांबे, मराविमचे कार्यकारी अभियंता व अधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकारी, महापालिकेचे इतर अधिकारी आणि आरटीओ, एमएसआरसीटीसी आदी प्राधिकरणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



या बैठकीत कल्याण रेल्वेस्थानक परिसरातील सेंटिस प्रकल्प कार्यान्वित होण्याकामी भेडसावणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. सुभाष चौक परिसरातील रस्ता रुंदीकरणात बाधित ऑप्टिकल इमारतीचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे या ठिकाणचे आवश्यक क्षेत्र महापालिकेस प्राप्त झालेले नाही. परिणामी, सुभाष चौकाकडील उड्डाणपुलाच्या उताराच्या कामास विलंब होत आहे. त्यामुळे कल्याण स्थानकाकडील सुभाष चौकाकडे जाणाऱ्या वाहनांसाठी मुख्य रस्त्याकडील परळीकर मार्गापासून रामबाग रस्त्यावरून सुभाष चौकापर्यंत वनवे केल्यास उड्डाणपुलाच्या उताराच्या रिटेनिंग वॉलचे काम सुरू होऊ शकते, असा प्रस्ताव या बैठकीत मांडला असता त्यावर चर्चा होऊन बुधवारी (ता. ५) वाहतूक विभागामार्फत अधिसूचना काढून कामास सुरुवात करावी, अशा सूचना अभिनव गोयल यांनी दिल्या.

बसेस दुर्गाडी येथून मार्गस्थ होणार

**सॅटिस प्रकल्पांतर्गत एमएसआरटीसीच्या इमारतीचे काम सुरू आहे. या एमएसआरटीसीच्या बसची वाहतूक अद्याप कल्याण बस स्थानकातून होत असल्याने स्थानकाचे काम पूर्ण करण्यास विलंब होत आहे. त्यामुळे येथील बस वाहतूक दुर्गाडी येथून करण्याबाबत वारंवार सूचना देऊनदेखील अद्यापपर्यंत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे बुधवारपासून लांब पल्ल्याच्या आणि रबाळे, पनवेल, भिवंडी येथे जाणाऱ्या सर्व बस दुर्गाडी येथून मार्गस्थ होतील, असे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.**

### छटपूजा दुर्घटना : गंधारे, रायते भागात सापडले बुडालेल्या मुलांचे मृतदेह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** छट पूजेनिमित्त कल्याण जवळील रायते भागात उल्हास नदी काठी उत्सव साजरा करण्यासाठी आलेल्या कुटुंबांमधील दोन मुले सोमवारी संध्याकाळी पाय घसरून उल्हास नदीत पडली. पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली. या दोन्ही मुलांचे मृतदेह बुधवारी सकाळी कल्याण पडघा रस्त्यावरील गंधारे नदी पुलाजवळ आणि एक मृतदेह रायता भागात नदी पात्रात आढळून आले.

कल्याण डोंबिवली पालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान मुख्य अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली या दोन्ही बुडालेल्या मुलांचा शोध दोन दिवसांपासून घेत होते. उल्हास नदीच्या पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे या मुलांचा शोध घेण्यात अग्निशमन जवानांना अडथळे येत होते. प्रिन्स गुप्ता (१६), राजन विश्वकर्मा (१८) अशी या दोन मृत मुलांची नावे आहेत.

कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील अनेक परप्रांतीय भाविक आपल्या कुटुंबीयांसह घर परिसरातील खाडी, नदी परिसरात छटपूजेसाठी सोमवारी संध्याकाळी आले होते. पाच ते सहा कुटुंब याठिकाणी छट पूजा करत होती. छट पूजेचा विधी सुरू असताना या कुटुंबीयांमधील दोन मुले कुटुंबीयांची नजर चुकवून नदी काठच्या दलदलीत फिरत होती. यामधील एका मुलाचा पाय घसरून तो नदीत पडला. त्याला वाचविण्यासाठी दुसरा पुढे गेला म्हणून तोही नदीत पडला. खोल पात्र आणि वेगवान प्रवाहामुळे हे दोघेही वाहून गेले होते.

## कर्जतच्या वाहतूक कोंडीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कर्जत, ता. २९:** कर्जत शहरामध्ये दिवसेंदिवस वाढत जाणारी लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यामुळे वाहतूक कोंडी आणि पार्किंगची समस्या अधिकच तीव्र होत चालली आहे. मुख्य रस्त्यांवर अनियोजित पार्किंग, रिक्षांचे मनमानी थांबे, बाजारपेठेतील अतिक्रमणे आणि वाहतूक पोलिसांची अपुरी उपस्थिती या सर्वांचा फटका रोजच्या प्रवाशांना बसत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर कर्जत शहर बचाव समितीच्या प्रतिनिधींनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण व कर्जत पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप भोसले यांची भेट घेऊन निवेदन दिले. शहरातील श्रीराम पुल, छत्रपती संभाजी महाराज चौक, चारफाटा, स्थानक परिसर इत्यादी ठिकाणी विशेषतः शनिवार-रविवारी गंभीर कोंडी निर्माण होते. वन-वे नियम लागू करून काहीसा दिलासा मिळतो, परंतु नियमांची काटेकोर अंमलबजावणी नसल्याने परिस्थिती पुन्हा बिघडते. म्हणूनच वाढीव वाहतूक पोलिसांची नेमणूक करून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी शहर बचाव समितीकडून या वेळी करण्यात आली. बाजारपेठेत हातगाड्या आणि परवानग्याच्या अर्धवट अंमलबजावणीमुळे पादचाऱ्यांना मार्ग काढणे कठीण होते आहे. त्यामुळे शुक्रवारचा बाजार पोलिस मैदानावर हलवावा तसेच शनिवार बाजाराचा दिवस योग्य पुनर्विचाराने बदलावा, अशी सूचना समितीकडून करण्यात आली. शिवाय भिसे खिंड परिसरातील बेकायदा छोटे व्यावसायिक नियोजित जागी हलविल्यास वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल, असे समितीचे मत आहे.






### नेरुळ येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे

# दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : नेरुळ येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे दिवाळी अंक प्रदर्शन 2025 चे आयोजन ग्रंथालयातर्फे करण्यात आले असून त्याचे उद्घाटन नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते आज करण्यात आले.

या प्रदर्शनात 102 विविध विषयांवरील दिवाळी अंक ठेवले असून, आठवडाभरासाठी आयोजित या दिवाळी अंक प्रदर्शनाच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील, प्रा.माणिकराव कीर्तने वाचनालयाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी, महापालिका नेरुळ विभाग अधिकारी डॉ.अनुराधा बाबर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय बनसोड, जेष्ठ नागरिक संघाच्या सार्वजनिक ग्रंथालयाचे अध्यक्ष प्रभाकर गुमास्ते, सुनील आचरेकर, रुग्णसेवा केंद्राचे अध्यक्ष रणजीत दीक्षित, सेंट ऑगस्टीन हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती समीरा माने, शब्दालय प्रकाशनाचे सुमित लांडे, लेखक गजानन म्हात्रे, सुभाष हांडे देशमुख, भालचंद्र माने तसेच सेंट ऑगस्टीन हायस्कूल मधील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक संघ नेरुळचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सांस्कृतिक समन्वय विशेषांक शब्दालय - 2025 या दिवाळी अंकाचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सौ. अमृता दिवाण यांनी लिहिलेला Love Interrupted हा ग्रंथ डॉ.कैलास शिंदे यांना भेट देण्यात आला.

ग्रंथालयाच्या प्रवेशद्वारावरच सेंट ऑगस्टीन हायस्कूल मधल्या विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे सुंदर स्वागत केले. त्यानंतर डॉ.कैलास शिंदे यांनी फित कापून दिवाळी अंकाच्या दालनाचे उद्घाटन केले. ठाणे जिल्ह्यात मुख्यतः नवी मुंबई क्षेत्रातील वाचकांना आवश्यक ते वाचन साहित्य या वाचनालयात उपलब्ध असून ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था असल्याने ग्रंथालयासाठी नेरुळ येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर भवन येथील इमारतीतील जागा महानगरपालिकेने उपलब्ध करून द्यावी, अशी विनंती आपल्या प्रास्तविकात जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील यांनी केली. सुभाष कुलकर्णी यांनी ग्रंथालय, वाचनालय यांचे मानवी जीवनातील महत्त्व विशद करुन वाचाल तर वाचाल या म्हणीचा उल्लेख करुन युवकांनी नियमितपणे वाचन केले पाहिजे असे स्पष्ट केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अमरजा चव्हाण यांनी केले. शेवटी संजय बनसोड यांनी आभार प्रदर्शन केले.

# जिल्हास्तर युवा महोत्सवात युवा शक्तीला मिळणार व्यासपीठ

राज्यातील युवकांमध्ये एकात्मतेची भावना जागृत करणे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मध्यमातून युवा वर्गातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी केंद्र शासनामार्फत सन 1994 या वर्षीपासून दरवर्षी दि.12 जानेवारी रोजी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

देशातील संस्कृती व परंपरा जतन करून या संस्कृतीचे संवर्धन करणारा प्रातिनिधीक युवा संघ वरील राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होतो. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे या कार्यालयाद्वारे युवा दिन, युवा सप्ताह व युवा महोत्सव निमित्ताने युवांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय, राज्य, विभाग व जिल्हास्तरावर करण्यात येते.

त्यानुषंगाने क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे जिल्ह्यात युवा महोत्सव आयोजनाबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. ज्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, कथा लेखन, चित्रकला, लोकनृत्य, लोकगीत कविता लेखन, नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) या बाबींचा समावेश आहे. जिल्हास्तरावरील विजेत्यांना प्राविण्य प्रमाणपत्र/बक्षीस रक्कम दिली जाईल. प्रावीण्य प्राप्त प्रथम व व्दितीय विजेते संघ पुढील विभाग व राज्यस्तरीय कार्यक्रमात भाग घेतील.

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार यांच्या दि.27 ऑगस्ट 2025 च्या पत्रान्वये राष्ट्रीय युवा महोत्सवाचे रुपांतर VBYLD मध्ये करण्यात आले असून तो विकसित भारत 2047 या दृष्टीकोनाशी जोडण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर NYF-VBYLD-2026 चे आयोजन युवा कार्यक्रम व खेळमंत्रालयाकडून केले जाणार आहे, ज्यामध्ये 15 ते 29 वयोगटातील युवकांचा सहभाग अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हास्तरावर युवा महोत्सव विकसित भारत चॅलेंज ट्रॅक चे आयोजन होवून स्पर्धक विभागस्तरावर सहभागी होतात, त्यातून गुणी कलावंतांची निवड होवून राज्यस्तरावरील युवा महोत्सवासाठी विभागाचा संघ पाठविला जातो, त्यानुसार या जिल्हास्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

· सांस्कृतिक - लोकनृत्य गट, सहभाग संख्या - 10, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ,

## वक्तृत्व, लोककला आणि नवोपक्रम स्पर्धांचे आयोजन

सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.

· सांस्कृतिक - लोकगीत गट, सहभाग संख्या - 10, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.

| जिल्हा क्रीडा अधिकारी - सदस्य सचिव<br>स्पर्धांचे प्रकार (Cultural & Innovation Track):- |
|---|
| 1. वक्तृत्व |
| 2. कथालेखन |
| 3. चित्रकला |
| 4. लोकनृत्य (गट) |
| 5. लोकगीत (गट) |
| 6. कविता लेखन |
| 7. नवोपक्रम विज्ञान प्रदर्शन |

· कौशल्य विकास - चित्रकला, सहभाग संख्या - 3, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.

· कौशल्य विकास - वक्तृत्व, सहभाग संख्या - 2, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग सख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.

· कौशल्य विकास - कविता, सहभाग संख्या - 2, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.

· कौशल्य विकास - नवोपक्रम विज्ञान प्रदर्शन, सहभाग संख्या - 3, केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे नियम, वेळ, सहभाग संख्या नमूद आहे. लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारीत संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.

| जिल्हास्तरीय युवा महोत्सव विकसित भारत चॅलेंज ट्रॅक आयोजन समिती संरचना:- |
|---|
| · जिल्हाधिकारी, ठाणे - अध्यक्ष, आयोजन समिती |
| · उपसंचालक, क्रीयुसे मुंबई - सदस्य |
| · जिल्हा युवा अधिकारी, नेहरू युवा केंद्र - सदस्य |
| · राष्ट्रीय सेवा योजना प्रमख संबंधित विद्यापीठ - सदस्य |
| · प्राचार्य शासकीय व निमशासकीय महाविद्यालय - सदस्य |
| · जिल्हा माहिती अधिकारी - सदस्य |
| · विज्ञान तंत्रज्ञान विषयक तज्ञ मान्यवर / प्राध्यापक / संस्था प्रतिनिधी 2- सदस्य |
| · संगीत व नृत्य तज्ञ/ विशारद / परीक्षक -3 प्रतिनिधी - सदस्य |

| बक्षिसांचा तपशील: |
|---|
| · समूह लोकनृत्य - प्रथम - 7 हजार, द्वितीय - 5 हजार, तृतीय - 3 हजार |
| · समूह लोकगीत - प्रथम - 5 हजार, द्वितीय - 3 हजार, तृतीय - 2 हजार 500 |
| · कथा लेखन - प्रथम - 3 हजार, द्वितीय - 2 हजार, तृतीय - 1 हजार 500 |
| · चित्रकला स्पर्धा - प्रथम - 3 हजार, द्वितीय - 2 हजार, तृतीय - 1 हजार 500 |
| · वक्तृत्व - प्रथम - 3 हजार, द्वितीय - 2 हजार, तृतीय - 1 हजार 500 |
| · कविता लेखन - प्रथम - 3 हजार, द्वितीय - 2 हजार, तृतीय - 1 हजार 500 |
| · नवोपक्रम - विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रकल्प सादरीकरण - प्रथम - 5 हजार, द्वितीय - 3 हजार, तृतीय - 2 हजार. |

# जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन समितीची बैठक संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन करण्याकरिता जिल्हास्तर आयोजन समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि.28 ऑक्टोबर 2025 रोजी संपन्न झाली. या बैठकीत सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून जिल्हा युवा महोत्सव यशस्वी करावा, जास्तीत जास्त युवक-युवतींचा सहभाग वाढेल, यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी सूचित केले.

या बैठकीत संचालनालयाच्या परिपत्रकानुसार समिती गठन करण्यास मान्यता प्रदान करणे, जिल्हास्तर युवा महोत्सवाचे ठिकाण व तारीख निश्चित करणे, युवा महोत्सवाच्या अंदाजपत्रक व खर्चास मान्यता देणे या विषयांबाबत सविस्तर चर्चा झाली.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी सूचित केले की, प्रतिवर्षी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येते, जिल्हा, विभाग, राज्यस्तर स्पर्धेमधून निवडलेला चमू राष्ट्रीय युवा महोत्सवात राज्याचे प्रतिनिधीत्व

**सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून जिल्हा युवा महोत्सव यशस्वी करावा -जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ**

करतो. युवा महोत्सवाच्या जिल्हास्तर आयोजन समितीमध्ये संचालनालयाच्या निर्देशानुसार 9 सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, यामध्ये पदसिद्ध सदस्यांसह आमंत्रित प्रतिनिधींची नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच विज्ञान व तंत्रज्ञान विषयक तज्ञ, संगीत विशारद प्रतिनिधी, नृत्य विशारद प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्याबाबत चर्चा होऊन मान्यता होणे आवश्यक आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'मन की बात'मधून संस्कृत, संस्कृती आणि सेवेचा जागर!

## माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या कार्यालयात झाले सार्वजनिक प्रक्षेपण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी प्रसारित झालेल्या 'मन की बात' कार्यक्रमात संस्कृत भाषेचे पुनरुज्जीवन, सोशल मीडियावरील तरुणांचे योगदान आणि आदिवासी वीरांच्या पराक्रमांचा उल्लेख करत देशवासीयांशी संवाद साधला. कल्याण पश्चिमेतील भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने जनसंपर्क कार्यालयात आयोजित सार्वजनिक प्रक्षेपणाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी जीएसटी बचत उत्सव, ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी वस्तू आणि आत्मनिर्भर भारत याबाबत देशवासीयांना संबोधित केले. पंतप्रधान मोदी म्हणाले, "संस्कृत म्हटले की आपल्या मनात वेद, उपनिषद, पुराणे, धर्मग्रंथ आणि अध्यात्म येते. पण या सर्वांसोबतच संस्कृत एकेकाळी संवादाची, शिक्षणाची आणि संशोधनाची भाषा होती. गुलामगिरीच्या काळात आणि स्वातंत्र्यानंतरही संस्कृतकडे दुर्लक्ष झाले, मात्र आता काळ बदलत असून संस्कृत नव्या जोमाने पुढे येत आहे."तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून आज अनेक तरुण संस्कृतला नवसंजीवनी देत आहेत. त्यांनी काही उदाहरणे देत यश साळुंके या तरुणाचा उल्लेख केला, जो संस्कृतमध्ये क्रिकेटवरील मनोरंजक व्हिडिओ तयार करतो.



कमला आणि जान्हवी या दोन बहिणी अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि संगीतावर संस्कृतमध्ये कंटेंट तयार करतात. तसेच 'संस्कृत छात्रोऽहम्', 'समष्टी' आणि भावेश भीमनाथानी यांसारखे तरुणही संस्कृतमधून विविध विषयांवर माहिती देत आहेत. तर "भाषा ही कोणत्याही संस्कृतीची वाहक असते. हजारो वर्षांपासून संस्कृतने ही भूमिका निभावली आहे आणि आजची तरुण पिढी ती जबाबदारी निभावत आहे," असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले. तसेच देशाचे राष्ट्रगीत असलेले 'वंदे मातरम्' या गीताला यंदा 7 नोव्हेंबर रोजी दीडशे वर्षे पूर्ण होत आहेत. हे केवळ एक गीत नाही, तर ते एक ऊर्जास्रोत आहे ज्याने कोट्यवधी भारतीयांना देशभक्तीच्या भावनेने प्रेरित केले आहे. आजही हे गीत आपल्याला राष्ट्रसेवेची आणि मातृभूमीप्रती निष्ठेची जाणीव करून देत आहे. त्यामुळे या राष्ट्रगीताच्या सन्मानार्थ संपूर्ण देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी केले. हॅशटॅगवंदे मातरम् 150 या नावाने देशातील जनतेने आपल्याला यासंदर्भातील सूचना पाठवण्यासह त्यांनी यावेळी सांगितले. तर सणासुदीच्या काळात बाजारात स्वदेशी वस्तूंच्या खरेदीत मोठी वाढ झाली असून ही सुखद गोष्ट असल्याची भावनाही मोदी यांनी यावेळी व्यक्त केली. यासोबतच पंतप्रधानांनी या मन की बातमध्ये इतिहासातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व — कोमाराम भीम — यांचा आणि त्यांच्या पराक्रमाचाही उल्लेख केला. "हैदराबाद संस्थानातील निजामच्या अत्याचाराविरुद्ध त्यांनी दिलेल्या लढ्याचे उदाहरण देत त्यांनी पुढे सांगितले की, "कोमाराम भीम यांनी फक्त ४० वर्षांचे आयुष्य जगले, परंतु त्यांच्या पराक्रमाने आदिवासी समाजात आत्मसन्मान आणि संघर्षाची भावना जागवली. १९४० मध्ये निजामाच्या सैनिकांनी त्यांची हत्या केली, पण ते आजही आदिवासी समाजासाठी प्रेरणास्थान असल्याचे त्यांनी सांगितले. तर १५ नोव्हेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या जनजातीय गौरव दिवसाचा उल्लेख करत मोदी यांनी भगवान बिरसा मुंडा यांना आदरांजली अर्पण केली. "बिरसा मुंडा यांनी स्वातंत्र्य संग्रामात आणि आदिवासी हक्कांच्या रक्षणासाठी केलेले कार्य अद्वितीय आहे. मला त्यांच्या उलीहातू या गावाला भेट देण्याचे सौभाग्य लाभले, तेथील भूमीची माती मी कपाळी लावली," असे त्यांनी सांगितले. कल्याण पश्चिमेतही वंदे मातरम् चा उत्सव साजरा करणार - (माजी आमदार नरेंद्र पवार ) भारताचे राष्ट्रगीत वंदे मातरम् ला यंदा 150 वर्षे पूर्ण होत असून त्यानिमित्त संपूर्ण देशभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी आमदार नरेंद्र पवार यांनी कल्याण पश्चिममध्ये वंदे मातरम् उत्सव साजरा करण्याचे जाहीर केले आहे. तसेच कल्याणातील प्रत्येक नागरिकानेही आपापल्या स्तरावर या राष्ट्रगीताला अभिवादन करण्याचे आवाहनही नरेंद्र पवार यांनी यावेळी उपस्थितांना केले.

# 'टाईमपास' फेम मलेरिया दादूस अभिनेता जयेश चव्हाण यांचं स्वप्न साकार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता जयेश चव्हाण, म्हणजेच 'टाईमपास' चित्रपटातील प्रेक्षकांच्या मनात घर करणारा मलेरिया दादूस, यांनी नुकताच त्यांच्या पनवेल मधील नवीन घराबद्दल सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे.

जयेश यांनी आपल्या अधिकृत अकाऊंटवर घराच्या प्रवेशद्वारासमोर उभं राहून घेतलेला फोटो शेअर करत, "हि वास्तु नाही, आमच्या स्वप्नांचा पहिला Take आहे." असं भावनिक




कॅप्शन लिहिलं आहे. या पोस्टनंतर काही क्षणातच चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव

**नवीन घरात गृहप्रवेश करताच शुभेच्छांचा वर्षाव**

झाला. जयेश चव्हाण हे अल्पावधीतच मराठी मनोरंजनविश्वात आपल्या अभिनय कौशल्यामुळे स्वतःच वेगळं स्थान निर्माण केलं आहे. त्यांची साधी, प्रामाणिक आणि मेहनती वृत्ती प्रेक्षकांना भावते. त्यांच्या या नवीन घरामुळे त्यांच्या आयुष्यात एक नवीन पर्व सुरू झालं असून, चाहत्यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्लास्टीक बंदी अंतर्गत केडीएमसी व पर्यावरण नियंत्रण मंडळाच्या पथकामार्फत कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागामार्फत प्रतिबंधीत प्लास्टीकच्या वापरावर बंदी घालण्यात आलेली असून शासन स्तरामार्फत निर्गमीत अधिसूचनेनुसार तसेच महापालिका आयुक्त श्री. अभिनव गोयल यांचे मार्गदर्शनानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र स्तरावरुन महापालिका क्षेत्रात प्रतिबंधीत प्लास्टीक बंदी अंतर्गत तपासणी करुन दंडात्मक कारवाई नियमीत स्वरुपात करण्यात येत असते.



त्याचबरोबर, महाराष्ट्र पर्यावरण नियंत्रण मंडळ यांचे दि.२८/१०/२०२५ च्या पत्रान्वये दि.२८ ऑक्टोबर २०२५ ते दि.३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये महाराष्ट्र पर्यावरण नियंत्रण मंडळ, कल्याण व महापालिका यांचे संयुक्त विद्यमाने फेरीवाले, फुल विक्रेते, स्थानिक बाजारपेठा, भाजी मंडई, स्टेशन परिसर, औद्योगीक क्षेत्रामध्ये तपासणी करुन प्रतिबंधीत प्लास्टीकचा वापर करणा-यांविरुध्द कारवाई करणेबाबत आदेश प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिका व महाराष्ट्र पर्यावरण नियंत्रण मंडळ, कल्याण विभाग यांचेमार्फत संयुक्तीरीत्या कारवाई करण्यात येत असून सदर तपासणी मोहिमेअंतर्गत दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी पथकामार्फत स्टेशन परिसर व कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरामध्ये तपासणी करुन एकल वापर प्लास्टीकचा वापर करणा-या विक्रेत्यांविरुध्द दंडात्मक कारवाई करुन रु.५०,०००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

तरी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीक तसेच व्यापारी व व्यावसायोक वर्गास आवाहन करण्यात येत आहे की, एकल वापर प्लास्टीकच्या वापरामुळे परिसर अस्वच्छ होत असून अशा प्लास्टीकच्या वापरामुळे पर्यावरणास तसेच आरोग्यास धोका निर्माण होत आहे. तरी, दैनंदिन व्यवहारामध्ये एकल वापर प्लास्टीकचा वापर न करता शाश्वत संसाधनांचा वापर करण्यात यावा. एकल वापर प्लास्टीकचा वापर टाळून महापालिका परिसर प्लास्टीक मुक्त करणेकामी महापालिकेस सहकार्य करावे.असे आवाहन रामदास कोकरे यांनी प्रसिद्धी पत्रकामार्फत केले आहे .




**मेष**

एखादा मित्र भेटायला घरी येऊ शकतो, ज्याला समोर पाहून तुमचा विश्वास बसणार नाही, वैयक्तिक समस्यांबद्दल मित्राशी बोलल्यानंतर हलके वाटेल.

**वृषभ**

दिवस अधिक नफा मिळविण्याचा आहे.वडिलांचे जीवन आणि कामाच्या ठिकाणी सहकार्य मिळेल. आज तुमच्या कौटुंबिक नात्यात गोडवा राहील.

**मिथुन**

व्यवसाय पुढे नेण्याची चांगली संधी आहे. स्पर्धेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची तयारी सुरूच राहणार आहे.व्यवसायाला पुढे नेण्यासाठी योजना कराल.

**कर्क**

त्वचेच्या समस्यांनी त्रस्त असलेले लोक आज चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्याल. व्यवसायातील भागीदारासोबत परदेशात जाण्याची शक्यता आहे.

**सिंह**

अभियंत्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे; चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे.दिवस आनंदाने भरलेला असणार आहे.कुटुंबात प्रशंसा होईल.

**कन्या**

खेळाशी संबंधित लोक प्रशिक्षणात खूप मेहनत घेतील. कुरिअर व्यावसायिकांना फायदा होईल. विद्यार्थी प्रॅक्टिकल करण्यासाठी वरिष्ठांची मदत घेतील.

**तूळ**

तुमचे यश गगनाला भिडणार आहे. बालपणीचा मित्र भेटेल, जुन्या आठवणी ताज्या होतील.दिवसाची सुरुवात एखाद्या गरीब व्यक्तीला मदत करून कराल.

**वृश्चिक**

धार्मिक कार्यात श्रद्धा आणि विश्वासाने पुढे जाल. आज जर तुम्ही तुमच्या कामात घाई करणे टाळले तर भविष्यातील समस्यांपासून तुमचे रक्षण होईल.

**धनु**

जीवनात काही बदल होऊ शकतात जे तुमच्यासाठी चांगले सिद्ध होतील. आज तुम्हाला काही काम पूर्ण करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागेल.

**मकर**

कुटुंबात आनंद आणि समाधान वाढेल. आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील.कामाचे कुटुंबात कौतुक होईल. दिवस महिलांसाठी खास असणार आहे.

**कुंभ**

घरात होणाऱ्या कोणत्याही धार्मिक विधीमुळे भक्तीचे वातावरण राहील. कौटुंबिक नात्यातील गैरसमज आज दूर होतील. कार्यक्रमात सहभागी व्हाल.

**मीन**

कुटुंबासोबत एखाद्या धार्मिक स्थळी दर्शनासाठी जाल, कौटुंबिक प्रेम वाढेल. आज शांत चित्ताने कोणतेही काम केल्यास ते लवकरच पूर्ण होईल.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण

मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त

प्रवेश सुरू (२०२५•२६)

पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी

एम.ए (एमसीजे)

(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)

-पात्रता-

कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण

- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -

टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .

- प्रवेशासाठी संपर्क -

९४२१०५९३९६

goveli_jssp@rediffmail.com

www.jeevandeepcollegegoveli.in





नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# ठाणे जिल्ह्यात ‘स्वप्नातील गाव’ प्रकल्पाचा शुभारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यात स्वदेस फाऊंडेशनच्या विकास कार्याचा शुभारंभ शहापूर येथील शेटे हॉलमध्ये कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते मंगळवार, दि.28 ऑक्टोबर 2025 रोजी संपन्न झाला. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, उपविभागीय अधिकारी ज्योती कांबळे तसेच स्वदेस फाऊंडेशनचे वरिष्ठ संचालक राहुल कटारिया आणि ठाणे जिल्हा व शहापूर तालुक्यातील विभागप्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वदेस फाऊंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार यांनी केले. त्यानंतर स्वदेस फाऊंडेशनचे उपसंचालक प्रसाद पाटील यांनी ‘स्वप्नातील गाव’ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी स्वदेस फाऊंडेशनची ध्येय धोरणे, ‘स्वप्नातील गाव कार्यक्रम’ व आगामी



विस्ताराबाबत सांगितले की, ‘स्वप्नातील गाव’ कार्यक्रमात ग्रामविकास समित्या संपूर्ण जबाबदारी स्वीकारून कार्य करतात, ज्यामुळे ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित होतो. या उपक्रमातून रायगड व नाशिक जिल्ह्यात 250 हून अधिक गावे ‘स्वप्नातील गाव’ म्हणून विकसित झाली आहेत. स्वदेस फाऊंडेशन आता शहापूर तालुक्यातील गावांमध्ये गाव विकास समिती स्थापन करून कार्य सुरू करणार आहे.कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी स्वदेस फाऊंडेशनच्या तळागाळातील कार्याचे कौतुक करीत, शहापूर तालुक्याच्या ग्रामपरिवर्तनासाठी सर्व शासकीय अधिकाऱ्यांनीदेखील सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच स्वदेस फाऊंडेशनचे संस्थापक रॉनी स्क्रूवाला, झरीना स्क्रूवाला, स्वदेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे आणि संपूर्ण स्वदेस टीमचे ग्रामीण सक्षमीकरणातील योगदानाबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ आणि प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी स्वदेस फाऊंडेशनबरोबर भागीदारीसाठी जिल्हा व तालुका स्तरावरील सर्व विभागांकडून संपूर्ण सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही दिली.

शहापूर तहसिलदार परमेश्वर कासुळे यांनी आपल्या मनोगतात इगतपुरी तालुक्यातील स्वदेस फाऊंडेशनच्या यशस्वी कामाचा उल्लेख करून त्यांच्या अनुभवांची माहिती दिली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तहसिलदार परमेश्वर कासुळे आणि गटविकास अधिकारी श्री. बी.एच. राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच स्वदेस फाऊंडेशनचे व्यवस्थापक रविंद्र राऊत, अरविंद पाताडे आणि विठ्ठल कुंदेकर यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या शेवटी गटविकास अधिकारी श्री.बी.एच. राठोड यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## आधी कचरा गाड्यांचे नियोजन करा ; मगच इतर उपक्रम राबवा

**– मोहन उगले**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या वतीने नागरिकांना कोणत्या दिवशी कोणता कचरा संकलित करणार याबाबतच्या सूचना एका तक्त्याद्वारे दिल्या आहेत. मात्र केडीएमसीच्या या नव्या कार्यप्रणालीवर शिवसेना उपशहर प्रमुख तथा माजी नगरसेवक मोहन उगले यांनी टीका करत आधी शहरात रस्त्यावर पडलेल्या कचऱ्याच्या गाड्यांचे नियोजन करून मगच कचऱ्याच्या बाबतीत इतर उपक्रम राबविण्याची मागणी उगले यांनी केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे.

याबाबत उगले यांनी सांगितले की, केडीएमसी मुकादम यांनी एक चार्ट पाठवलेला आहे. कुठल्या दिवशी काय कचरा द्यायचा. मात्र कल्याण डोंबिवली महापालिकेतील नागरिक 950 रुपये अतिरिक्त भार कचऱ्याचा देत आहेत. असे असतांना शहरांमध्ये सर्व ठिकाणी जो कचरा दिसत आहे आणि ज्या कचऱ्याच्या गाड्या रस्त्यावर पडलेल्या आहेत त्याचा पहिले नियोजन करा त्यानंतर बाकीच्या गोष्टीचं आपण वास्तवात उतरवायचा प्रयत्न करा अशी मागणी मोहन उगले यांनी केली आहे.

या महापालिकेमध्ये बरेच आयुक्त येऊन गेलेले आहेत परंतु या महापालिकेमध्ये कुठल्याही प्रकारची सेवा जनतेला मिळत नाही. केडीएमसीकडे कामगार आहेत परंतु प्रत्यक्षता ते दिसत नाहीत. त्यामुळे प्लास्टिक काच भंगार प्लायवुड यासारख्या गोष्टी गौण आहेत. पहिले नागरिकांना सुख सुविधा द्या याकडे लक्ष द्या. नागरिकांच्या कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने आपले एसआयसीएसआय अतिरिक्त आणि आयुक्त यासारख्या लोकांकडे वारंवार तक्रारी केलेल्या असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा पडत आहे. त्याचे कुठल्याही प्रकारचे वर्गीकरण होत नाही याकडे देखील उगले यांनी आयुक्तांचे लक्ष वेधले आहे.

तर आधी शहरांमध्ये चार बाय सहा च्या कचराकुंड्या होत्या, नागरिक त्यामध्ये कचरा टाकत होते. परंतु घनकचरा विभागाचे उपायुक्त रामदास कोकरे यांनी या कचरा कुंड्या हटविल्याने नागरीक रस्त्यावर कचरा टाकत असून, रस्त्यावर वीस बाय पंचवीस एवढा कचरा निर्माण होत आहे. त्यामुळे करदात्या नागरिकांना सुविधा देणे हे महापालिकेचे कर्तव्य असून आधी उपलब्ध असलेल्या कचऱ्या गाड्यांचे योग्य नियोजन करून मग नागरिकांवर वेगवेगळ्या प्रकारचा कचरा वेगवेगळ्या दिवशी संकलित करण्याचा उपक्रम लादावा अशी मागणी शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांनी केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे.

## माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या हस्ते ‘हिंद केसरी’ हॉटेलचे उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण -** कल्याण पश्चिमेतील खडक पाडा चौकाजवळील साई चौक परिसरात ‘हिंद केसरी’ या सुप्रसिद्ध हॉटेल चेनच्या नव्या शाखेचे नुकतेच माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. हिंद केसरी’ हे महाराष्ट्रातील दर्जेदार खाद्यपदार्थ आणि उत्कृष्ट सेवेसाठी प्रसिद्ध नाव आहे. आता कल्याणकरांनाही या गुणवत्तापूर्ण




खाद्यसंस्कृतीचा आनंद घेता येणार आहे. नव्याने सुरू झालेले हे हॉटेल प्रशस्त जागेमध्ये, सुंदर सजावट आणि कुटुंबांसाठी योग्य वातावरणासह सज्ज करण्यात आले आहे. या हॉटेलची खासियत म्हणजे इथली मांसाहारी थाळी, या थाळीच्या चवीने नाशिक, पुण्यासह अनेक ठिकाणच्या खवय्यांना वेड लावले आहे. आता हीच थाळी कल्याणातही उपलब्ध झाली आहे. उद्घाटन समारंभावेळी माजी नगरसेवक सुनील वायले, समाजसेविका नीतू कोटक, कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्षा हेमलता पवार, तसेच हॉटेलच्या मालक स्नेहा प्रसाद केवणे, प्रिती प्रशांत पेठे, ज्योती निखिल पालवे आणि वर्षा मेहेत्तर उपस्थित होते. या वेळी बोलताना माजी आमदार नरेंद्र पवार म्हणाले, “मराठमोळी चव, उत्कृष्ट सेवा आणि पारंपरिक आदरातिथ्य यामुळे ‘हिंद केसरी’ हॉटेल कल्याणमधील खवय्यांसाठी एक नवा आनंदाचा ठिकाण ठरेल. प्रत्येकाने येथे एकदा तरी भेट देऊन चवीचा अनुभव घ्यावा. असे आवाहन खवय्यांना केले आहे. या नामांकित हॉटेलच्या उद्घाटन सोहळ्याने कल्याणच्या खाद्यजगतात आणखी एक नवीन आकर्षण निर्माण झाले आहे.

## वाड्यात एसीबी मार्फत भ्रष्टाचार निवारण जनजागृती अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा : वाड्यात आय. टी. जिनियस कॉम्प्युटर एज्युकेशन येथे पालघर ए.सी.बी. (अँटी करप्शन ब्युरो) मार्फत भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्र अंतर्गत जनजागृती अभियान राबविण्यात आले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे नाव ऐकताच अनेक भ्रष्ट अधिकारी घाबरतात, पण सध्या नागरिकांना या विभागाकडे थेट तक्रार करता येते हे फारसे माहीती नसते. ह्याबाबत माहिती, नागरिकांमधले गैरसमज दूर करण्यासाठी पोलिस उपअधीक्षक दादाराम करांडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष जनजागृती मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत जर कोणत्याही सरकारी कामासाठी कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी स्वतः किंवा इतरांमार्फत लाचेची मागणी करत असेल, तर नागरिकांनी त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा अशा आशयाची माहितीपत्रके नागरिकांना वाटप करण्यात येत आहेत, ज्यावर भ्रष्टाचार निवारक विभागाचे टोल-फ्री नंबर, हेल्पलाईन, ई-मेल आयडी, वेबसाइट इत्यादीची माहिती देण्यात आली आहे. ज्यामुळे नागरिक कोणत्याही**



**प्रकारच्या भ्रष्टाचाराची तक्रार थेट नोंदवू शकतील. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते अनंता वनगा, कर्मचारी विकास कांबळे, शिक्षक अजय भोईर, वकिली क्षेत्रातून नितेश म्हसे, कपिल पाटील, शाळा - कॉलेजेसच्या विद्यार्थ्यांसह आय. टी. जिनियसमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उपस्थितांचे म्हणणे, प्रश्न ऐकूण घेऊन त्यांच्या सर्व शंकांचे निरसन व प्रश्नांची उत्तरे अधिकाऱ्यांनी दिली. लाचलुचपत विभाग हे नागरिकांच्या हक्कांसाठी काम करणारे एक महत्वाचे शासकीय यंत्र आहे. अनेकांना या विभागाबद्दल गैरसमज होते, पण या मोहिमेमुळे ते दूर होत आहेत असे प्रतिपादन पोलीस उपअधीक्षक दादाराम करांडे ह्यांनी केले. त्यांच्या समवेत लाचलूचपत विभागाकडून पोलिस हवालदार प्रकाश दळवी उपस्थित होते.**

## ठाण्यात सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत सायबर गुन्ह्यांनी अक्षरशः कळस गाठला आहे. आतापर्यंत वर्षभरात तब्बल २५९ सायबर गुन्हे दाखल झाले असून त्यामध्ये सर्वाधिक शेअर मार्केट, गुंतवणूक, बचत आणि पॉलिसी रिलटेड फंड याबाबतचे आहेत. या गुन्ह्यांमध्ये भामट्यांनी ठाणेकरांना तब्बल एक अब्ज ४७ कोटी ४० लाख ३५ हजार ६१६ रुपयांचा गंडा घातल्याचीही धक्कादायक बाब समोर आली. हे वाढते प्रमाण लक्षात घेऊन शहर पोलिसांकडून वेळोवेळी जनजागृती केली जात आहे.

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील पाच परिमंडळांतर्गत ३४ पोलिस ठाणी आणि एक सायबर सेल पोलिस ठाणे असे ३५ पोलिस ठाणी कार्यरत आहेत. सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेत, ठाण्यात सायबर पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात आली आहे. दिवसेंदिवस ऑनलाइनचा वापर वाढल्याने सायबर गुन्ह्याचे प्रमाणही वाढत आहे. या वर्षातील सप्टेंबरपर्यंत दाखल २५९ गुन्ह्यांची सरासरी पाहिल्यास दर महिन्याला २८ गुन्हे नोंदवले असल्याचे दिसत आहे. या गुन्ह्यांमध्ये जानेवारी महिन्यात तब्बल ४३ सायबरचे सर्वाधिक गुन्हे नोंदवले गेले आहेत. तर एप्रिल महिन्यात अवघे १९ गुन्ह्यांचा समावेश आहे.

पोलिस ही अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने गुन्ह्यांचा माग काढत आहेत. त्याचबरोबर नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाकडून केले जात आहे. फिशिंग लिंक, बनावट गुंतवणूक योजना आणि समाजमाध्यमावरील फसव्या प्रोफाइलपासून सावध राहण्यासही सांगितले जात आहे.

### फसवणुकीचे २६ फंडे

सायबर गुन्ह्यांमध्ये तब्बल २६ फंड्यांचा वापर भामटे करत असल्याचे पोलिस तपासात समोर आले. यामध्ये सर्वाधिक शेअर मार्केट, गुंतवणूक, सेव्हिंग आणि पॉलिसी रिलटेड फंड याचा वापर केला जात आहे. त्यापाठोपाठ फंड, फिशिंग कॉल, एसएमएस, लिंक याचा वापर गंडा घालण्यासाठी होत आहे. ऑनलाइन जॉब वर्क, डिजिटल अरेस्ट यासारख्या प्रकाराचा वापर होत आहे.

## रायगड जिल्ह्यात नवीन अंगणवाडी केंद्रांना मंजुरी

### - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील अंगणवाड्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी “स्मार्ट अंगणवाडी किट” खरेदीस राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील ३१५ अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून, या केंद्रांचे रूपांतर आदर्श आणि अत्याधुनिक सुविधांनी युक्त ‘स्मार्ट अंगणवाड्यां’मध्ये करण्यात येणार आहे. या योजनेमुळे प्रत्येक अंगणवाडीत शिक्षण, आरोग्य, पोषण, स्वच्छता व बालसंगोपनासाठी आवश्यक असणारे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. केंद्रांमध्ये मुलांसाठी आनंददायी, सुरक्षित आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास मदत होईल.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, स्मार्ट अंगणवाडी योजनेमुळे राज्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील लहान मुलांना सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी शिक्षणाचे वातावरण उपलब्ध होईल. मुलांच्या सर्वांगीण विकासासोबतच महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वाचा टप्पा ठरेल.

रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, श्रीवर्धन, रोहा, म्हसळा, महाड, अलिबाग, पोलादपूर, कर्जत, खालापूर, सुधागड आणि पनवेल या सर्व तालुक्यांतील अंगणवाड्या या योजनेत समाविष्ट आहेत. यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील बालकांना दर्जेदार शिक्षण, पोषण आणि आरोग्यसेवा मिळणार असून स्थानिक अंगणवाड्या आधुनिक शिक्षण व आरोग्य विकासाचे केंद्र म्हणून विकसित होतील.

या प्रकल्पामुळे अंगणवाडी सेविकांना तंत्रज्ञानाधारित शिक्षण पद्धती व पोषण व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळणार आहे. तसेच, बालकांच्या वाढीचा, आरोग्याचा व पोषणस्थितीचा मागोवा घेण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर होईल. नवीन अंगणवाड्या बालकांचे पोषण, आरोग्य तपासणी व पूर्व-शिक्षण अधिक परिणामकारकपणे पार पाडतील. तसेच गर्भवती व स्तनदा महिलांना आरोग्य सेवा आणि पोषण मार्गदर्शन सुलभपणे उपलब्ध होईल.महिला व बालविकास विभाग राज्यातील अंगणवाड्या सुसज्ज, आकर्षक आणि कार्यक्षम बनविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून ‘स्मार्ट अंगणवाडी योजना’ ही बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासनाने उचललेले अत्यंत महत्त्वाचे आणि दूरदृष्टीचे पाऊल ठरणार आहे.


## कुळगांव-बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता. अंबरनाथ जि. ठाणे.ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- https://kbmc.gov.in

### जाहीर नोटीस

**विषय** : मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. ७४०४/२०२३ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाकडे दि.०७/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये अनधिकृत बांधकामाची यादी प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. ७४०४/२०२३ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाकडे दि. ०७/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील अनधिकृत बांधकामाची यादी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेबाबत आदेशित केले आहे.

**अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण बाबतची यादी**

| अ.क्र. | नावं | पत्ता | विषय |
|---|---|---|---|
| १. | श्री. मुकालादियल थोमास कोचकुंज | मौजे सोनिवली गायत्री मंदिर समोर चोण रोड बदलापूर वेस्ट मोजे सोनिवली सर्वे नं-३७/१ | अनधिकृत बांधकाम |
| २. | श्री.स्वामी समर्थ सर्व्हिस सेंटर | छत्रपती शिवाजी महराज स्मारक समोर बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| ३. | टिंबर मार्ट | के फूड इन हॅाटेल बाजूला बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| ४. | माउली कार केअर | देव हार्मोनी सोसायटी जवळ पनवेल हायवे शिरगाव बदलापूर (पूर्व) | अनधिकृत बांधकाम |
| ५. | उतारा ढाबा रॉयल ढाबा | वेद हाईट्सच्या समोर पनवेल हायवे शिरगाव बदलापूर (पूर्व) | अनधिकृत बांधकाम |
| ६. | किरण ऑटोमोबाईल | हर्ष मार्बल ग्रेनाईट शॉप बाजुला स्पींग हूड अपार्टमेंट बाजूला पनवेलकर हायवे शिरगाव बदलापूर (पूर्व) | अनधिकृत बांधकाम |
| ७. | चंपारन दरबार | शुभ वास्तू अपार्टमेंटच्या बाजूला पनवेल हायवे शिरगाव बदलापूर (पूर्व) | अनधिकृत बांधकाम |
| ८. | तंदूर राव हॅाटेल | शुभ वास्तू अपार्टमेंट जवळ पनवेल हायवे शिरगाव बदलापूर (पूर्व) | अनधिकृत बांधकाम |
| ९. | श्री स्वामी स्पर्श फर्निचर | आनंद लॉन्स पाण्याच्या टाकी जवळ बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| १०. | श्री समर्थ कृपा सर्विस सेंटर | मातोश्री लॉन्स समोर बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| ११. | फ्रेश चिकन शॉप | भाऊचा ढाबाजवळ पनवेल हायवे शिरगाव बदलापूर (पूर्व) | अनधिकृत बांधकाम |
| १२. | ७-१२ ढाबा | श्री ग्रुप बाजूला नवदुर्ग आश्रम समोर पनवेल हायवे शिरगाव बदलापूर (पूर्व) | अनधिकृत बांधकाम |
| १३. | दरबार पान शॉप | मोहन पाम च्या पाठीमागे पनवेल हायवे शिरगाव बदलापूर (पूर्व) | अनधिकृत बांधकाम |
| १४. | श्री दत्ता कृपा सर्विस सेंटर | मातोश्री लॉन्स बाजूला बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| १५. | साब्बर अली अन्सारी गॅरेज | लक्ष्मीदीप सोसायटी समोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार जवळ पनवेल हायवे शिरगाव बदलापूर (पूर्व) | अनधिकृत बांधकाम |
| १६. | सुरभी मसाले चहा | मातोश्री लॉन्स बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| १७. | एस.के.आपा फर्निचर | छत्रपती शिवाजी महराज स्मारक समोर बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| १८. | रॉलीस टॉवेल आणि सॅनेटरी वेअर | नाईन पाम हॅाटेल बाजूला बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| १९. | अहाद इंटरप्रायजेस | छत्रपती शिवाजी महराज स्मारक समोर बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २०. | अहमद फर्निचर | मातोश्री लॉन्स समोर बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २१. | भाग्य लक्ष्मी फॅब्रिकेशन वर्क्स | आनंद लॉन्स जवळ बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २२. | परफेक्ट मॅकेनिकल वर्क्स | आनंद लॉन्स समोर बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २३. | देहेरकर लॉन्स | वैकुंठ धाम प्रवेशद्वार जवळ बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २४. | पारोम अँकेडमी | पाण्याच्या टाकी जवळ बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २५. | हिंदुस्तान सिरामिक | मातोश्री लॉन्स समोर बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २६. | हिंदुस्तान सर्विस सेंटर | मातोश्री लॉन्स समोर बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २७. | नितीन फूड्स | मातोश्री लॉन्स बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २८. | के.फूड.इन फेमिली रेस्टोरंट | नाईन पाम हॅाटेल बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| २९. | नितीन फर्निचर इंटरप्रायजेस | मातोश्री लॉन्स बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| ३०. | नेहुमड फर्निचर | मातोश्री लॉन्स बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |
| ३१. | न्यू गोल्डन फर्निचर | पाण्याच्या टाकी समोर बदलापूर गाव रोड | अनधिकृत बांधकाम |

उक्त यादीतील अनधिकृत बांधकामधारक / अतिक्रमणधारक यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की. आपण अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण तात्काळ निष्कासित करण्यात यावे अन्यथा नगरपरिषदेमार्फत सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन यंत्रसामग्री व साधनसामग्री मोहोरबंध करण्यात येईल. अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासाठीचा खर्च आपणाकडून वसूल करून महाराष्ट्र नगरपरिषद , नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ अन्वये १८९ चे (८) व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५६ अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सही /-**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव-बदलापूर नगरपरिषद**
**कुळगांव**





# शहापूरमध्ये पथनाट्यद्वारे सायबर क्राईम जनजागृती उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** शहापूर पोलिस ठाण्याच्या वतीने सायबर क्राईम सप्ताह निमित्ताने बसस्थानक येथे पथनाट्यद्वारे जनजागृती हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल व पोलिस उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तर पोलिस निरीक्षक मुकेश ढगे यांच्या सुचनेनुसार शहापूरात सायबर क्राईम हे नेहमीच जनजागृतीपर उपक्रम हाती घेत असतात.

सहा.पोलीस निरीक्षक शिवकुमार जाधव, महिला पो.उपनिरी मोहिनी कपिले यांच्या समवेत पोलिस कर्मचारी यांच्या उपस्थितीत व ठाणे देवी प्रोडक्शनचे निलेश घाडी, अमर पाखरे आदी सादरकर्ते यांच्या माध्यमातून पथनाट्य सादर करुन जनजागृती मोहीम राबविण्यात आली.



# दुभाजक, उद्याने आणि मैदानांचा होणार कायापालट

## केडीएमसीचा अभिनव उपक्रम





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने शहराचे सौंदर्य आणि स्वच्छता वाढवण्यासाठी एक व्यापक "शहर सुंदर अभियान" सुरू केले आहे. या अंतर्गत शहरातील मुख्य रस्ते, दुभाजक, उद्याने, खेळाची मैदाने आणि सार्वजनिक ठिकाणांची रंगरंगोटी, दुरुस्ती आणि सजावट केली जात आहे.

पालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर शहरातील सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभिकरण होत आहे. हा उपक्रम केवळ सौंदर्यवर्धनापुरता मर्यादित नसून, नागरिकांना आरामदायी आणि स्वच्छ सार्वजनिक वातावरण मिळावे, हा त्यामागचा उद्देश असल्याची माहिती मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांनी दिली आहे. "सध्या या कामांचा अंदाजे २५ टक्के भाग पूर्ण झाला आहे. उर्वरित काम गतीने सुरू असून, नवीन वर्षापूर्वी शहराला नव्या आकर्षक रुपात सादर करण्याचा प्रयत्न आहे." विशेष म्हणजे रस्त्यांवरील दुभाजकांची रंगरंगोटी ही शहरातील विकासकांच्या मार्फत केली जात असून पालिकेला त्यासाठी एकही रुपया खर्च करावा लागणार नाही.

**उपक्रमाची वैशिष्ट्ये:**


- **शहरातील प्रमुख रस्त्यांवरील डिव्हायडरची पुन्हा रंगरंगोटी आणि वनस्पती सजावट**
- **उद्यानांतील बाक, खेळणी, व्यायाम साधनांची दुरुस्ती**
- **मैदानांच्या आजूबाजूचा कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता मोहीम**
- **सार्वजनिक भिंतींवर भित्तीचित्रांच्या माध्यमातून सामाजिक संदेश**

दिवाळीतच हा उपक्रम राबवण्याचा पालिकेचा मानस होता. मात्र सततच्या अवकाळी पावसामुळे काही प्रमाणात विलंब झाला. तरीही, प्रशासनाने कामाच्या गुणवत्तेवर कोणतीही तडजोड न करता गतीकायम ठेवल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सध्या कल्याण-डोंबिवलीच्या रस्त्यांवर रंगीत दुभाजक, आकर्षक उद्याने आणि सुशोभित मैदानांनी नवीन झळाळी आणली आहे. या उपक्रमामुळे शहराच्या सौंदर्यात भर तर पडेलच, पण नागरिकांच्या जीवनमानातही सुधारणा होईल, असा विश्वासही मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांनी व्यक्त केला.

महानगरपालिकेचा हा प्रयत्न "स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक कल्याण-डोंबिवली"च्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. मात्र त्यासाठी शहरातील नागरिकांनीही त्यामध्ये आपले योगदान दिल्यास शहर स्वच्छ होण्यास आणखी मदत होईल यात तिळमात्र शंका नाही.

# पाणी देयक न भरल्यास ठाणे महापालिका करणार कारवाई





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** महापालिकेची पाणी देयके थकबाकी वसुलीकरिता पाणीपुरवठा विभागाने कारवाई सुरू केली आहे. या वर्षी एप्रिलपासून आतापर्यंत ४३ कोटींची पाणी देयके वसूल झाली आहेत. हे प्रमाण एकूण वसुलीच्या सुमारे १८ टक्के आहे. थकबाकी वसुलीकरिता सर्व प्रभाग समिती स्तरांवर मोहीम सुरू करण्यात आली आहे. पाणी देयकाचा भरणा न करता, खंडित नळजोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करून घेतल्यास अशा पाणीचोरांविरोधात गुन्हे दाखल करण्याचीही कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली.

ठाणे पालिकेच्या पाणी देयकांची एकूण रक्कम सुमारे २५० कोटींच्या घरात आहे. त्यापैकी ९२ कोटी २८ लाख थकबाकीपोटीचे आहेत, तर चालू वर्षाची देयक रक्कम ही १५७ कोटी ८० लाख रुपये आहे. पाणी देयकाची थकबाकी न भरल्यास नळजोडणी खंडित करून पाणीपुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. ठाणे महापालिकेने २०२४-२५ या वर्षात पाणी देयकांपोटी १४८ कोटी ९५ लाखांची वसुली करण्यात यश मिळवले होते. ही वसुली २०२३-२४च्या तुलनेत १५ कोटींनी अधिक होती. या आर्थिक वर्षात पाणीपुरवठा विभागाने थकबाकी आणि चालू बिलांची १०० टक्के वसुली करावी, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे मंगळवारी (ता. २८) सायंकाळी बैठक झाली. उपनगर अभियंता विनोद पवार यांनी या बैठकीत वसुलीची स्थिती आणि कारवाईचे स्वरूप याबद्दल मार्गदर्शन केले. या बैठकीस सर्व कार्यकारी अभियंता, उप अभियंता, मीटर रिडर आदी उपस्थित होते.

दर सोमवारी आढावा घेणार

अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आणि नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांच्या मार्गदर्शनात पाणी देयक वसुली मोहीम राबवण्यात येत आहे. या वसुलीच्या मोहिमेचा आढावा पाणीपुरवठा विभागातर्फे दर सोमवारी घेतला जाणार आहे. त्यात अहवाल सादर न केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे. पाणी देयकांच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागांत नळजोडणी खंडित करणे, मोटार पंप जप्त करणे, मीटर रूम सील करण्यात येत आहेत. त्यामुळे पाणी देयकांची रक्कम वेळच्या वेळी भरून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

# लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी पूर्ण करावी

## - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी व लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळावा याकरीता https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ई-केवायसी ची सुविधा 18 सप्टेंबर पासून दोन महिन्याच्या कालावधी करीता उपलब्ध करण्यात आली आहे. ई-केवायसी ची प्रक्रिया अत्यंत सोपी व सुलभ असून आत्तापर्यंत अनेक लाभार्थ्यांनी ई-केवायसी ची प्रकिया यशस्वी पूर्ण केली आहे . इतर लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना ई-केवायसी प्रक्रियेबाबत येणाऱ्या समस्यांवर उपाययोजनाबाबत आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचे ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण केले जात आहे. ही प्रक्रिया अतिशय सोपी व सुलभ असून, महिला स्वत:च्या मोबाईलवरूनही ही प्रक्रिया कमी वेळात पुर्ण करू शकतात. ज्यांनी अद्याप ई-केवायसी केली नाही त्यांनी 18 नोव्हेंबर पर्यंत ही प्रक्रिया पुर्ण करावी.

# भिवंडीत शेतावर गेलेल्या महीलेची दगडाने ठेचून हत्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या चावे-भरे येथील शेतावर गेलेल्या एका महीलेची अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केल्याने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे.

चावे गावातील एक ६८ वर्षीय महीला मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे गावाजवळील शेतावर गेली होती.११-३०च्या सुमारास कुणीतरी अज्ञात व्यक्तीनी तिच्या डोक्यात दगडी आपटून गंभीर जखमी केले होते. गंभीर जखमी अवस्थेत शेतातील गवतांमध्ये पडलेल्या या महीलेला एका गुरे चारणाऱ्या गुराख्याने पाहील्यानंर ही घटना उघडकीस आली महीलेच्या शेजाऱ्यांनी व कुंटबीयांनी जखमी अवस्थेत उपचारासाठी प्रथम प्राथमिक आरोग्य केंद्र आंनगाव येथे नेले असता महीलेची अवस्था गंभीर असल्याने तेथील डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी इंदिरा गांधी भिवंडी येथील हॉस्पिटलात घेऊन जाण्यास सांगितले. इंदिरा गांधी हॉस्पीटल येथे उपचारासाठी नेले असता दाखल करण्यापूर्वीच तेथील डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले. शेतावर गेलेल्या महीलेवर अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केल्याचा आरोप महीलेच्या कुंटबीयांनी केला असुन सदर महीलेचा मुलगा दिनेश बारकु काकडे यांच्या तक्रारीवरून गणेशपुरी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधीक तपास गणेशपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कमलेश बच्छाव हे. करीत आहेत.

# कुणबी संस्थेच्या अध्यक्षपदी पाटील

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबाडी :** भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती आणि राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे ठाणे जिल्हा सरचिटणीस देविदास आत्माराम पाटील यांची नुकतीच कुणबी समाज सेवा संस्था ठाणे-पालघर जिल्ह्याच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. समाजातील या जुन्या जाणत्या बुर्जुग कार्यकत्यांची निवड झाल्याने त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. नोंदणीकृत असलेल्या या कुणबी सेवा संस्थेत एकूण ८०० आजीव सदस्य संख्या आहेत. ही संस्था सामाजिक, शैक्षणिक व कृषी क्षेत्रात काम करत असून वधू-वर मेळावे, समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन, तसेच समाजातील अनिष्ट रूढी परंपरा बंद करण्यासाठी जनजागृती करण्यात प्रयत्नशील असलेल्या वा संस्थेचे कार्य ठाणे आणि पालघर जिल्ह्यात सुरु आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष देविदास पाटील हे सन २०१७ ते २०२२ तसेच सन २०२२ ते २०२५ कालावधीत कुणबी समाज सेवा संस्थेचे खजिनदार आणि उपाध्यक्ष आहेत, दांडगा जनसंपर्क आणि सामाजिक कार्यात भरीव कामगिरी करणारे देविदास पाटील भिवंडी तालुक्यातील दुगाड येथील भूमिपुत्र आहेत.



# संकट काळात धाऊन जाणारा कुशल प्रशासकीय अधिकारी

## - तहसीलदार अभिजित देशमुख







दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** एक कर्तव्यदक्ष, जनतेची कणव असणारा, संकट काळात धाऊन जाणारा व प्रशासनाची उत्तम जाण असणारा अधिकारी असेल तर नक्कीच जनतेला न्याय भेटत असतो. लोकाभिमुख निर्णय घेऊन, कार्यक्षम प्रशासन चालविण्याची धम्मक ज्यांच्यात असते आणी लोकशाहीला खर्या अर्थाने बळकटी येते. हे सर्व गुण ज्यांच्या ठायी दिसून येतात ते आहेत लोकसेवक मुरबाडचे तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अभिजित भाऊसाहेब देशमुख.

मुरबाडचे तहसीलदार म्हणून रूजू झाल्या पासून एक वेगळी शिस्त त्यांनी महसूल कर्मचाऱ्यांना लावली. त्याच बरोबर त्यांनी स्वतःची कामाची एक शैली वापरून प्रशासनात अनेक बदल घडवून आणले आहेत. आजपर्यंत नैसर्गिक आपत्तीत स्वतः लक्ष टाकून शासनदरबारी पाठपुरावा करून जनतेला न्याय देण्यासाठी आग्रही असतात. मग ते संकट कोणतेही असो. कुठे पुरपरिस्थिती निर्माण होवो, पर्यटक अडकण्याच्या घटना असोत, पुरात वाहून गेलेली घटना असो की आग लागण्याची घटना असो सर्वात अगोदर धाऊन जाणारे तहसीलदार म्हणजे अभिजीत देशमुख साहेब. कोणताही मोर्चा अथवा आंदोलन असो ते चिघळून न देता त्यातून एक शांततेचा यशस्वी मार्ग काढण्याची त्यांची भुमिका नेहमीच वाखाणन्या सारखी आहे. डोक्यावर बर्फ व तोंडात साखर व प्रशासकीय कौशल्य वापरून त्यांनी अनेक वेळा योग्य भुमिका निभावली आहे.

एवढेच काय आपल्या एका चतुर्थ श्रेणीमधे शिपाई पदावर काम केलेल्या कर्मचाऱ्याला सेवानिवृत्त झाल्यावर आपल्या खुर्चीत बसवून स्वतःच्या गाडीत घरा पर्यंत सोडणारे, माणुसकीचा झरा बाळगणारे आगळे आणी वेगळे असे अधिकारी म्हणजे देशमुख साहेब.

नुकताच तालुक्यात अस्मानी संकट उभे राहिले आहे. परतीच्या पावसाने धुमाकूळ घालून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावला आहे. शेतकरी संकटात असताना त्यांना शासनाकडूनआर्थिक मदत मिळावी, त्यांच्या वेदना समजून घ्याव्यात म्हणून कोणताही गाजावाजा न करता स्वतः तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे अश्रू पुसत त्यांना आधार देण्याचे एक महत्वपूर्ण काम तहसीलदार अभिजित देशमुख यांनी केले आहे. यापुर्वी असे घडले नाही. त्याच बरोबर सरसकट पंचनामे करण्याचे आदेशही त्यांनी महसूल व कृषी विभागाच्या अधिकार्यांना दिले असून ते शासन दरबारीं पाठवून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत कशी होईल यासाठी त्यांचे प्रयत्न असणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

शासकीय योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत, तळागाळातील माणसा पर्यंत पोहचविणारे, प्रशासनाचा दांडगा अनुभव पाठीशी असणारे एक उत्तम प्रशासकीय अधिकारी म्हणजे अभिजित भाऊसाहेब देशमुख आहेत असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही.

# अलिबाग येथील कराटे स्पर्धेत वैदेहीने पटकावले सुवर्णपदक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ पेण:** अलिबाग येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये कराटे विभागात रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील पिरकोन विद्यालयातील वैदेही योगेश घरत हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक पटकावले आहे.

जिल्हास्तरीय क्रीडास्पर्धेत १५ तालुक्यामधून कराटे पटूनी सहभाग घेतला होता.वैदेही घरत हिने 17 वर्षे वयोगट आणि 50 ते 60 वजनी गटात सहभाग घेतला होता. सुरुवातीच्या फेऱ्यापासून वैदही घरत हीचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा होता प्रत्येक सामन्यात तीने प्रतिस्पर्धकावर वर्चस्व राखले.शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता टिकून असलेल्या या लढतीत वैदहीने विजय मिळवून





सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे.या यशाबद्दल शाळेच्या स्कूल कमिटीचे चेअरमन जीवन गावंड , दहागाव माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष कृष्णा पाटील रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागाचे विभागीय अधिकारी कोंगेरे एम. के. आदींनी अभिनंदन केले.

शाळेच्या प्राचार्य सौ ए.ए. पाटील यांनी सांगितले की आमचे विद्यार्थी केवल अभ्यासातच नाही तर क्रीडा क्षेत्रातही चमकत आहेत याचा आम्हाला अभिमान आहे.तसेच विद्यालयाचे क्रीडा प्रमुख डाढाले बी.बी. यांनी खूप मेहनत घेतली, तसेच विद्यालयातील पाटील पी एम, म्हात्रे एस आर, सौ. पाटील एस सी. सौ पाटील एम एस आणि सर्व सेवक वृंद यांनी वैदेहीचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# केंद्र सरकारच्या जाचक अटीमुळे | ठाणे जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रांचा जाहिर निषेध

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**झिडके-अंबाडी :** केंद्र सरकारने विशेषतः ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी बी,बियाणे व खते पुरविणारी " कृषी सेवा केंद्र" यांच्या संबंतात " साथी पोर्टल फेज-2" हा जाचक व अडचणीचा नियम लागू केल्यामुळेच राज्यातील कृषी सेवा केंद्रांची नेतृत्व करणारी संघटना "मफदा" म्हणजेच " महाराष्ट्र फर्टिलायझर सीड प्रेस्टीसाईड असोसिएशन" संघटनेने राज्यभर तीव्र नाराजी व्यक्त करून बंद पाळून केंद्र सरकारच्या या जाचक व व्यवसायात अडीअडचणी निर्माण करण्याच्या या नियमाचा जाहीररित्या निषेध केला आहे.

या संबंधात ठाणे जिल्हा Agro केम असोसिएशनचे अध्यक्ष- समीर सिताराम ठाकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार केंद्र सरकारने " साथी पोर्टल फेज-2 हा लागू करण्यात आलेला नियम हा ग्रामीण भागातील लहान-मोठ्या सर्वच कृषी सेवा केंद्रांसाठी जाचक व आर्थिकदृष्ट्या खर्चाचा त्याचबरोबर दैनंदिन व्यवहार कामकाजाच्या अडचणीचा आहे,त्यामुळेच शासनाने यासंदर्भात साथी पोर्टल फेज-1 ची अंमलबजावणी ज्या-ज्या बी-बियाने उत्पादक कंपन्या आहेत,त्यांच्यावर साथी पोर्टल फेज-2 च्या बाबतीत बंधन घालावे की,जेणेकरून शेतकऱ्यांना दर्जेदार व



उत्कृष्ट बी-बियाणे उपलब्ध होतील.केंद्र शासनाच्या या नियमाचा निषेध म्हणून सबंध ठाणे जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रांनी आपली संतप्त प्रतिक्रिया म्हणून ठाणे जिल्ह्याच्या ठिकाणी एकत्र येऊन आपला जाहीर निषेध दिनांक-28/10/2025 रोजी जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा बंद करून," मफदा" या आपल्या राज्य संघटनेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.व या नियमाची सक्ती केंद्रशासनाकडून केली जाऊ नये,की जेणेकरून " कृषी सेवा केंद्र चालकांना केंद्रशासनाच्या जाचक नियम अटींमुळे राज्यभर आंदोलनाचा पवित्रा घेणे भाग पडेल.तरी केंद्रशासनाने ग्रामीण भागातील शेतकरीवर्गाची सेवा करणाऱ्या कृषी सेवेबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशीही याठिकाणी "मफदा" या राज्य संघटनेची भूमिका आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ■ नवी मुंबई ■ ठाणे ■ पालघर ■ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024